**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नाव : अलका लक्ष्मण पोंदे,
वय : ६५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी,
राहणार : लाखणगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे.

**<u>सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी. एस. वाळके</u>**

१. मी आरोपींना ओळखते, ते आमचे नातेवाईक आहे. घटना दि.१७/०४/२०२५ रोजी लाखणगाव येथील माझ्या घरासमोर घडली. त्या दिवशी माझ्या लहान मुलाचे लग्न जमले असल्याने मी गावी आले होते. आरोपी संतोष पोंदे हा आमच्या जाण्या येण्याच्या रस्त्यावर खुट्या ठोकत होता. मी त्याला माझ्या लहान मुलाचे लग्न आहे, खुट्या ठोकु नकोस असे सांगत होते. त्यानंतर तो मला शिवीगाळ करु लागला. त्यानंतर आरोपी रोहिणी पोंदे, अनुजा पोंदे, अनिकेत पोंदे हे तेथे आले व त्यांनी मला हाताने मारण्यास सुरुवात केली.

२. मी त्यांना समजावुन सांगत होते तरी त्यांनी माझा एकही शब्द ऐकला नाही व मला मारहाण केली. त्या दिवशी संध्याकाळी माझी मुल आली, मी त्यांना झालेली घटना सांगितली. आम्ही त्याला समजावण्यासाठी जिथे खुट्या ठोकल्या आहेत तेथे गेलो. तेव्हा त्यांनी आम्हाला शिवीगाळ केली व माझा मुलगा शिवाजी याचे गचुंडे पकडले. आरोपी संतोषने त्याची पत्नी रोहिणीला मला मारण्यास सांगितले. त्यानंतर अनुजा व अनिकेत पळत आले. त्यानंतर अनिकेत याने लोखंडी खो-याने माझ्या डाव्या दंडावरती व डाव्या पोटरीवर मारहाण केली. अनिकेत माझ्या डोक्यात खो-याने मारण्यास आला असता बाबाजीने अडवल्याने त्याच्या उजव्या हाताच्या करंगळीच्या शेजारचे बोट खो-याने फ्रॅक्चर झाले.

३. त्यानंतर आम्ही पारगाव पोलीस स्टेशन येथे गेलो असता त्यांनी आम्हाल उपचाराकामी शिंगवे येथे पाठविले. शिंगवे येथील दवाखाना बंद असल्याने आम्ही मंचर येथे

जाऊन उपचार घेतला. त्यानंतर आम्ही पारगाव पोलीस स्टेशनला गेलो. त्यानंतर पारगाव पोलीसांनी आम्हाला शिंगवे येथे सरकारी दवाखान्यातच जावे लागेल असे सांगितले. त्यानंतर आम्ही शिंगवे येथील सरकारी दवाखान्यात जाऊन उपचार घेतला व फिर्याद दाखल केली.

४. आता दि.१७/०४/२०२५ रोजीची मी पोलीसात दिलेली फिर्याद मला दाखविण्यात आली. ती तिच आहे. सदर फिर्याद मला त्यावेळी व आता देखील वाचुन दाखवली. त्यावर माझा अंगठा आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२०** देण्यात येते. आता मला दि.१७/०४/२०२५ रोजीची मी पोलीसात दिलेली छापिल फिर्याद मला दाखविण्यात आली. ती तिच आहे. सदर फिर्याद मला त्यावेळी व आता देखील वाचुन दाखवली. त्यावर माझा अंगठा आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२१** देण्यात येते.

५. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी संतोश पोंदे व रोहिणी पोंदे आजरोजी न्यायालयात हजर आहे. आरोपीने मला मारलेल्या लोखंडी खो-यास पाहिल्यास मी ओळखु शकते.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे वकीलांच्या लेखी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**
**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि.०७/०३/२०२६**
**घोडेगाव**